

# उन्नत महाराष्ट्र अभियान

उच्च शिक्षण संस्था व त्यातील शिक्षक, संशोधक व विद्यार्थी हे राज्याची महत्त्वाची साधनसंपत्ती आहे. महाराष्ट्राचे प्रश्न सोडवण्यासाठी लागणारे काटेकोर संशोधन, मनुष्यबळ, शासनाच्या कार्यप्रणालीचे विश्लेषण व त्यात आवश्यक त्या सुधारणांची शिफारस, नवीन उद्योग इ. हे सगळे उच्च शिक्षण व संशोधन संस्थांकडून अपेक्षित आहे. पण या सगळ्यासाठी या संस्था, शासन व समाज यामध्ये एक समन्वय असणे गरजेचे आहे. उन्नत महाराष्ट्र अभियान ही अनोखी योजना या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. स्थानिक व प्रादेशिक संस्थांनादेखील भोवतालच्या समाजाला स्वत:चे महत्त्व व योगदान पटवून देण्याची सुवर्णसंधी आहे.

प्रत्येक अभियांत्रिकी संस्थेमधील विद्यार्थ्याला, त्याचा/तिचा पदवीच्या शेवटच्या वर्षी पडणारा पहिला मोठा प्रश्न आहे तो म्हणजे नोकरीचा. ती मिळेल की नाही, व त्याचे काय पॅकेज असेल, असे अनेक प्रश्न पडतात. त्यांनाच नव्हे तर त्यांचे पालक, ज्यांनी या शिक्षणासाठी पदरचे किमान रु. ४-५ लाख खर्च केले असतात, तेसुद्धा या बाबतीत काळजीत असतात. हा यक्षप्रश्न आपण सर्वांबरोबर, मोठे तज्ज्ञ व आपले लोकप्रतिनिधी यांनासुद्धा तेवढ्याच तीव्रतेने जाणवत आहे. दरवर्षी महाराष्ट्रात ६०,०००-९०,००० तरुण अभियांत्रिकी पदवीधरांसाठी नोकऱ्या तयार व्हायच्या कोठून?

गेल्यावर्षी म्हणजेच संस्थांमधील जवळपास ४० टक्के जागा रिकाम्या होत्या. हे दृश्य नुसते महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, पूर्ण भारतभर आहे . एका बाजूला हे चित्र असताना, मेक इन इंडियाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यामुळे देशामधील अभियांत्रिकी उत्पादन व त्याला लागणारे मनुष्यबळ व संशोधन हे दोन्ही वाढणे गरजेचे आहे.

दुसऱ्या बाजूला, रस्ता, वीज, पाणी, ज्या मुळात अभियांत्रिकी सेवा आहेत, याबाबत सामान्यांच्या अपेक्षा पुरवणे अवघड होत चालले आहे. यामागची कारणे आहेत हवामानात बदल, वाढत्या गरजा, कमकुवत मनुष्यबळ, व अत्यंत महत्त्वाचे म्हणजे या क्षेत्रांमधल्या जुनाट अभियांत्रिकी पद्धती आणि नियोजनाचा अभाव. याचबरोबर या परिस्थितीला इतर सांस्कृतिक कारणेसुद्धा जबाबदार आहेत - जसे की, मावळती सामाजिक बांधिलकी व एकजूट, तरुणांच्या पांढरपेशी अपेक्षा, व खिळखिळी झालेली प्रादेशिक व्यवस्था.

याचा अर्थ एका बाजूला सुशिक्षित तरुणांसाठी नोकऱ्यांचा अभाव व त्याचबरोबर मोठे उद्योग किंवा विकास या दोन्हीला लागणाऱ्या तंत्रज्ञानाचाही अभाव आहे, अशी विचित्र व परस्परविरोधी समस्या आपल्या पुढे आहे. यामागचे एक महत्त्वाचे कारण आहे अभियांत्रिकी संस्थांमधला अभ्यासक्रम, शिक्षणपद्धती आणि संशोधन यांचा खालावलेला दर्जा व उपयुक्तता.


## उन्नत महाराष्ट्र अभियान

या सगळ्याचा विचार जरी देशाच्या पातळीवर होत असला, व त्यात बरीच तज्ज्ञ मंडळींची देखरेख असली तरी आपल्या सामान्यांचे विकासाचे प्रश्न व आपले लघु व गृहउद्योग यांच्या तांत्रिक गरजा, सोडवणे अत्यंत निकडीचे झाले आहे.

या दिशेने एक महत्त्वाचा प्रयोग आहे महाराष्ट्र सरकारतर्फे मुख्यमंत्री यांचे कार्यालय व आयआयटी बॉम्बेच्या सीटीएआरए (सितारा) या संस्थेचा संयुक्त उपक्रम - उन्नत महाराष्ट्र अभियान. यामध्ये, भारत सरकारच्या उन्नत भारत अभियान या केंद्रशासित संस्थांसाठी लागू असणाऱ्या उपक्रमाला एक वेगळी कलाटणी देण्यात आली आहे. पहिल्या सदरात उन्नत महाराष्ट्र अभियान हे अभियांत्रिकी संस्थांसाठी लागू आहे. यामध्ये, प्रादेशिक संस्था व त्यांचे विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक, यांना प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवर अभ्यास करण्यासाठी एक मोठी संधी उपलब्ध आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, समाजसेवी संस्था व स्थानिक प्रशासन यांनी मांडलेले प्रश्न व समस्या उदा. गावाचा विकास आराखडा तयार करणे, बिघडलेल्या पाणीपुरवठा योजनेचे विश्लेषण, तालुकानिहाय सिंचन आराखड्याची तपासणी, शहरी परिवहन नियोजन आराखडा, जिल्ह्याच्या छोट्या उद्योगांसाठी मार्गदर्शन इ., असे अनेक प्रकल्प हे शिक्षणसंस्था व त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. अभ्यासासाठी मागणी आल्यावर, संस्थेने एक प्रकल्प प्रस्ताव तयार करावा. ज्यामध्ये अभ्यासाची रूपरेषा, त्याला लागणारी माहिती, खर्च व अभ्यासाची उपयुक्तता याचे विवरण असेल. या प्रस्तावावर जिल्हाधिकारी किंवा सक्षम अधिकारी यांनी योग्य तो निर्णय तत्परतेने घेणे सुचवले आहे. हा अभ्यास, योग्य त्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी किंवा नवपदवीधर यांनी करायचा आहे व त्यासाठी संस्थांनी त्यांच्या नियमांमध्ये योग्य ते फेरबदल करणे अपेक्षित आहेत. त्याचबरोबर, असे प्रकल्प घेण्यासाठी



लागणारी कुशलता जसेकी शासनाची व्यवस्था व उपक्रम याबद्दलची माहिती, जिल्ह्यातील उद्योग व त्यांच्या संघटना, जिल्ह्यातील प्रयोगशाळा, जनगणना, तलाठी व इतर नकाशे यांचे संख्याशास्त्र, गावाची रचना, समाजशास्त्र व गावामध्ये वावर याबद्दल मार्गदर्शन, हे सगळे अभ्यासक्रमात एक स्वतंत्र विषय म्हणून येणे गरजेचे आहे . याने अभ्यासाचा व अंतिम अहवालाचा दर्जा उंचावेल. अभ्यासाचा हा अहवाल व त्याचे प्रस्तुतीकरण हे पुन: स्थानिक प्रतिनिधी व स्थानिक प्रशासन यांच्यासमोर मांडले गेले पाहिजे व हा अहवाल, संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असला पाहिजे. त्याचबरोबर, या अहवालाची एक प्रत तंत्रशिक्षण संचालनालय यांच्याकडे जमा करावी लागेल. या अभियानाची सविस्तर माहिती व अंतिम वर्षीय विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प विषय यांची सूचक यादी खाली नमूद केलेल्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.



सीटीएआरएचे मार्गदर्शन दोन प्रकारे योजिले आहे. पहिले म्हणजे, सीटीएआरएच्या ३० वर्षांच्या अनुभवामध्ये ज्या काही केस स्टडीज व स्थानिक प्रश्नांविषयक अभ्यास आहेत; हे महाराष्ट्राच्या सर्व संस्थांसाठी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर, उन्नत महाराष्ट्र अभियान छत्राखाली झालेल्या घडामोडी, महत्त्वाचे शासन निर्णय, इतर संस्थांनी केलेले चांगले प्रकल्प अहवाल, हे सगळे तंत्रशिक्षण संचालनालयाबरोबर सीटीएआरएच्या संकेत स्थळावर उपलब्ध असेल. मागणीनुसार आलेले विषय वा अभ्यासप्रणाली यांच्यावर संस्थांसाठी प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. याशिवाय, सीटीएआरएचे दुसरे कार्य असेल उन्नत महाराष्ट्र अभियान सल्लागार समितीमार्फत महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या विभागांशी समन्वय साधणे, दर्जा सांभाळणे व विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांची मांडणी करणे.

## भवितव्य

मूलभूत सोयी व सुविधा जोपर्यंत सुधारत नाहीत तोपर्यंत देशाचे औद्योगिकीकरण सुद्धा खुंटलेलेच राहील. या सुविधा जिल्ह्यात असल्या शिवाय कुठलाही उद्योजक त्या जिल्ह्यात उद्योग सुरू करणार नाही. याचाच अर्थ असा की, रोजगार व व्यवसायांमध्ये स्थायी व शाश्वत स्वरूपाची वाढ ही प्रथम रस्ता, वीज, पाणी व इतर मूलभूत व सामान्य विकासाच्या क्षेत्रांमध्ये होईल. विकासाचे नियोजन, त्याला लागणारी यंत्रसामग्री हेच भारताच्या औद्योगिकीकरणाचे पहिले पर्व असेल. या विकासपर्वामध्ये कार्यरत असलेले उद्योग व कंपन्या पुढे कृतिशील व सर्जनशील राहतील. अनेक विकसित देशांचा नेमका हाच अनुभव आहे.

आपले अभियांत्रिकी अभ्यासक्रम व संशोधन यावर नजर टाकली तर गेली ५० वर्षे तरी ते एका वैश्विक विज्ञान व तंत्रज्ञान प्रणालीच्या चौकटीत बसवलेले आहे. स्थानिक विकास विषयांबाबत काही प्रमाणात तरी अनभिज्ञ आहे. असे वैश्विक विषय शिकवण्यामध्ये दर्जा सांभाळणे व त्यात संशोधन करणे हे काही थोडक्या संस्थांनाच शक्य होते. या थोड्या संस्थांमधील विद्यार्थी व त्यांच्या जागतिक कंपन्यांमधील नोकऱ्या सोडल्या तर, इतर पदवीधरांना नोकरीची शाश्वती नाही.

मात्र, विकासाची उन्नत अभियांत्रिकी प्रणाली ही प्रादेशिक संस्थांसाठी एक महत्त्वाचा पर्याय उपस्थित करते. मेक इन इंडियाचे उद्योगपर्व, यासाठी देखील ही प्रणाली पोषक ठरू शकते.

उन्नत महाराष्ट्र अभियानामुळे सामान्य जनतेला त्यांच्या प्रश्नांबाबत एक महत्त्वाचा अधिकार उपलब्ध होईल. तो म्हणजे शास्त्रोक्त व त्रयस्थ विश्लेषणाचा. पण सर्वात महत्त्वाचा घटक आहे ती तरुण पिढी. स्वत:चा व भोवतालच्या समाजाचा विकास याची सांगड घालून देणे, त्यांच्यासमोर स्थानिक रोल मॉडेल्स उभे करणे व एक व्यापक सांस्कृतिक व व्यावसायिक व्यक्तिमत्त्व घडवणे ही आपल्या समोरची महत्त्वाची उद्दिष्टे व जबाबदारी आहे. ही चिरस्थायी जबाबदारी पार पाडण्यात उन्नत प्रणालीचे नक्कीच योगदान राहील.

**उन्नत महाराष्ट्र अभियान याची संकेत स्थळे**

http://www.dtemaharashtra.gov.in/teqip/CMS/Content_Static.aspx?did=325

http://www.ctara.iitb.ac.in/tdsc/uma

**– मिलिंद सोहोनी**
सीटीएआरए, आयआयटी बॉम्बे
(sohonicse.iitb.ac.in)